**ठळक बातम्या**

- राज्यातल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार सर्वतोपरी मदत देईल, असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं आश्वासन

- गेल्या ६ वर्षांत देशभरात १७ कोटीहून जास्त रोजगार निर्मिती

- शक्ती चक्रीवादळाच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात जोरदार पावसाची शक्यता/ देशाच्या अनेक भागात मुसळधार पावसाचा इशारा

**आणि**

- पश्चिम बंगालमधे अतिवृष्टीमुळे किमान २० जणांचा मृत्यू

**<><><><>**

राज्यातल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार सर्वतोपरी मदत देईल असं आश्वासन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिलं आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात लोणी इथं शेतकरी मेळाव्याला ते संबोधित करत होते

**.... होल्ड - बाईट- शहा - -**

शेतकऱ्यांना उत्पन्नाचं आणखी साधन मिळावं याकरता सहकारी साखर कारखान्यांनी गाळप चालू नसताना इथेनॉल तसंच भाजीपाला आणि इतर उत्पादनांसाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन अमित शहा यांनी केलं. प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याच्या विस्तारित परिसराचं उद्घाटन आज शहा यांच्या हस्ते झालं. तसंच पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण त्यांनी केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. आपल्या भाषणात ते म्हणाले.

**... होल्ड- बाईट- मुख्यमंत्री - -**

उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही भाषणं यावेळी झाली.

**<><><><>**

देशात गेल्या सहा वर्षात सुमारे १७ कोटी नवीन रोजगारांची निर्मिती झाली आहे. कामगार आणि रोजगार मंत्रालयानं यासंदर्भात जारी केलेल्या आकडेवारीनुसार वर्ष २०२३-२४ मध्ये ६४ कोटी ३३ लाख रोजगार निर्माण झाले असून सहा वर्षांपूर्वी २०१७-१८ मध्ये ही संख्या ४७ कोटी ५० लाख इतकी होती. याशिवाय बेरोजगारीच्या दरात देखील मोठी घट झाली असून २०२३-२४ मध्ये तो साडेतीन टक्के पर्यंत खाली उतरला आहे.

देशात नव्यानं सुरु झालेले स्टार्टअप्स, स्किल इंडिया, रोजगार मेळावे, पी एम विश्वकर्मा योजना, मनरेगा, पी एम विकसित भारत रोजगार योजना आणि लखपती दीदी यांसारख्या इतर योजनांना या रोजगार निर्मितीचं श्रेय असल्याचंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा परिषदेने जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. यामुळे समाजातल्या सर्व घटकांना लाभ झाला आहे. आज ऐकूया वस्त्रोद्योग उद्योगाविषयी...

**---व्हीसी---**

*(सामान्य माणसावरचा भार कमी करण्यासाठी केंद्र सरकारने वस्त्रोद्योगावरचा जीएसटी कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या कररचनेनुसार हस्तनिर्मित धाग्यांवरील जीएसटी १८ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. याशिवाय अडीच हजारांपेक्षा कमी किमतीच्या रेडिमेड कपड्यांवरील जीएसटी ५ टक्के झाला आहे. यामुळे सर्वसामान्यांना विविध फॅशनचे कपडे परिधान करणं सहज परवडणार आहे. वस्त्रोद्योगावरील जीएसटी कमी झाल्यामुळे कपड्यांचे दरही कमी होणार आहेत. यामुळे कपड्यांची मागणी वाढेल आणि उत्पादनही वाढेल. तसंच निर्यातीतही वाढ होणार आहे. याचा सगळ्यात मोठा फायदा मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीयांना होणार आहे. यामुळे भारताला जागतिक स्तरावर वस्त्रोद्योगाचं केंद्र बनायला मोठी मदत मिळेल यात शंका नाही.)*

**<><><><>**

राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये कफ सिरपच्या सेवनानं काही मुलांचे मृत्यू झाल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्यांच्या आरोग्य सचिवांची बैठक बोलावली आहे. आज संध्याकाळी चार वाजता आरोग्य मंत्रालयाच्या सचिवाच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार असून सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव,

आरोग्य सचिव यात सहभागी होणार आहेत. तसंच औषध नियंत्रक देखील सहभागी होतील. दूरदृश्यप्रणालीद्वारे होणाऱ्या या बैठकीत कफ सिरपचा गैरवापर तसंच औषधांची गुणवत्ता यावर चर्चा होणार आहे.

दरम्यान, दोन वर्षांहून कमी वयाच्या बालकांना सर्दी-खोकल्याची औषधं दिली जाऊ नयेत, अशा सूचना केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं काल सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना दिल्या.

**<><><><>**

मराठवाडा विभाग पदवीधर मतदार संघ मतदार नोंदणीला प्रारंभ झाला आहे. मतदारांनी येत्या सहा नोव्हेंबर पर्यंत नाव नोंदवण्याचं सांगण्यात आलं आहे. पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीची मतदार यादी दर वेळी नव्यानं तयार करण्यात येते. त्यामुळं यापूर्वीच्या निवडणुकीतील मतदार यादीत आपलं नाव असलं तरी ते रद्द होत असल्यानं पुनर्नोंदणी गरजेची असल्याचं यंत्रणेतर्फे कळवण्यात आलं आहे. मतदार हा मराठवाड्यातल्या आठही जिल्ह्यातला कोणत्याही वयाचा, कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि रहिवासी असावा. तर, एक नोव्हेंबर २०२२ पुर्वीचा तो पदवीधर असावा. तालुक्याच्या तहसील कार्यालयात मतदार अर्ज जमा करता येतील.

**<><><><>**

ईशान्य अरबी समुद्रात निर्माण झालेल्या शक्ती या चक्रीवादळाची तीव्रता वाढत असून पुढच्या काही दिवसात ते अधिक शक्तिशाली होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी चक्रीवादळाचा इशारा देण्यात आला आहे. येत्या मंगळवारपर्यंत उत्तर कोकण किनारपट्टी भागात जोरदार वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. समुद्रात सध्या ताशी १०० किमी वेगाने वारे वाहत असल्याने मच्छिमारांनी ७ ऑक्टोबरपर्यंत समुद्रात जाऊ नये असा इशारा दिला आहे.

मराठवाड्याच्या काही भागात आज जोरदार वाऱ्यांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर,विदर्भातल्या काही जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसंच, विदर्भ आणि मराठवाडा विभागात, परवा सात ऑक्टोबरपर्यंतही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

<><><><>

पश्चिम बंगालमधे मुसळधार पाऊस होत असून भूस्खलनाच्या घटनांमधे किमान २० जणांचा मृत्यू झाला. तिस्ता नदीला पूर आला आहे, राष्ट्रीय महामार्गांवर पाणी साचलं आहे. शेतात आणि घरात पाणी शिरलं आहे. एनडीआरएफची पथकं आपद्‌ग्रस्त भागात मदतकार्य करत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. केंद्र सरकार परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि दुर्घटनाग्रस्तांना तातडीनं मदत पुरवली जाईल असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><>

धाराशिव जिल्ह्यात गेल्या आठ दिवसापासून विश्रांती घेतलेल्या पावसानं जिल्ह्यात पुन्हा जोरदार हजेरी लावली असून काल रात्री अकरा वाजल्यापासून रात्रभर भूम, वाशी आणि कळंब तालुका परिसरात जोरदार पाऊस बरसला. नद्यांचं पाणी वाढल्यानं अनेक गावांकडे जाणारे रस्ते बंद आहेत. सध्या पावसाचा जोर ओसरला असून वातावरण ढगाळ आहे. मांजरा धरणाचा पंधरा हजार क्युसेक वेगाने विसर्ग देखील सुरू करण्यात आला आहे.

<><><><>

सोलापूर जिल्ह्यातल्या पुरग्रस्त 82 गावात आरोग्य आणि स्वच्छतेची व्यापक मोहीम, जिल्हा परिषद यंत्रणेनं हाती घेतली आहे.

पहिल्या टप्प्यात 53 गावात ही मोहिम राबवण्यात आली आहे. या सर्व गावांमध्ये आरोग्य शिबिरं घेऊन नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली.

<><><><>

ग्राम विकास विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या आर. आर. पाटील सुंदर गाव पुरस्कार योजनेअंतर्गत २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी पालघर जिल्ह्यातल्या आठ गावांची ‘सुंदर गाव पुरस्कार’साठी निवड झाली आहे. यामध्ये पालघर तालुक्यातलं कुरगाव हे गाव जिल्हास्तरीय सुंदर गाव ठरलं आहे. कुरगाव ग्रामपंचायतीला जिल्हास्तरीय ४० लाख आणि तालुकास्तरीय १० लाख असं मिळून ५० लाख रुपयांचं बक्षीस देण्यात आलं. हा पुरस्कार पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते, रोजगार मेळावा आणि सेवा पंधरवडा समारोप समारंभात प्रदान करण्यात आला. पुरस्कारप्राप्त ८ गावांमध्ये, कुरगाव सह,

आमगाव - आच्छाड, हमरापूर, वसुरी, खोडाळा, खानिवडे, झाप, आणि घोलवड या गावांचा समावेश आहे. त्यांना प्रत्येकी १० लाख रुपयांचं बक्षीस देण्यात आलं आहे.

**<><><><>**

बिहारमधे मतदारयाद्यांचं सखोल पुनरीक्षण यशस्वी झालं असून राजकीय पक्षांना अजूनही काही आक्षेप असतील तर ते नोंदवू शकतात, असं निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं. बिहारमधल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आज पाटणा इथं वार्ताहरांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. निवडणुकीच्या तयारी संदर्भात पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत निवडणूक आयोगाची बैठक झाल्याचं ज्ञानेश कुमार यानी सांगितलं.

**<><><><>**

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज, भारत-पाकिस्तान लढत सुरू आहे. श्रीलंकेत कोलंबो इथं दुपारी तीन वाजता हा सामना सुरु झाला. पाकिस्तानबरोबर आतापर्यंत झालेले सर्व ११ एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचा महिला संघ विजयी झाला आहे.

**//<><><><>//**